ePaper

**शिंदे गटाकडून युवासेनेची कार्यकारिणी जाहीर; राज्यभरात नेमले नवे पदाधिकारी**



| वर्ष - 6 | अंक - 170 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

नवरात्रौत्सव
आजचा रंग
**राखाडी**



www.mahaenews.com | ।शनिवार।दिनांक 1 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# कोंडीमुक्त वाहतुकीसाठी ‘रिंगरोड’!

## रस्ते महामंडळाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प : 1 हजार 740 हेक्टर क्षेत्र संपादीत करणार

**।पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (महाराष्ट्र स्टेट रोड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन – एमएसआरडीसी) प्रस्तावित केलेल्या वर्तुळाकार रस्त्यासाठी एकूण १७४० हेक्टर क्षेत्र संपादित केले जाणार आहे. त्यात सर्वाधिक १६०१ हेक्टर क्षेत्र खासगी आहे. विशेष म्हणजे या रस्त्यासाठी लष्कराची जागा कुठेही घ्यावी लागणार नाही.**

भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ते महामंडळाकडून १७२ कि.मी. लांबीचा आणि ११० मी. रुंदीचा रस्ता केला जाणार आहे.

हा प्रकल्प पूर्व आणि पश्चिम अशा दोन विभागांत विभागण्यात आला आहे. पूर्व भागात मावळ तालुक्यातील ११ गावे, खेडमधील १२ गावे, हवेलीतील १५, पुरंदरमधील पाच आणि भोरमधील तीन गावांचा समावेश आहे, तर पश्चिम भागात भोरमधील पाच, हवेलीतील ११, मुळशीतील १५ आणि मावळ तालुक्यातील सहा गावांचा समावेश आहे. मावळ, मुळशी, खेड, हवेली, पुरंदर आणि भोर या तालुक्यांमधून हा प्रकल्प प्रस्तावित आहे.

मावळ, मुळशी उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत एकूण ५६४ हेक्टर क्षेत्र संपादित केले जाणार आहे. त्यात खासगी ५२०.३२ हे., गायरान जमीन



०.२२ आर, वन विभागाची २३.५२ हे., तर इतर विभागांची २०.४० हे. क्षेत्र संपादित केले जाणार आहे. हवेली उपविभागीय अधिकारी खासगी ४८५.८९ हे., गायरान ८.२७ हे., वन जमीन ६२.८० हे. आणि इतर विभागांची ६.८५ हे. क्षेत्र संपादित होणार आहेत. भोर उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत खासगी १५९.२२ हे., वन जमीन २.३३ हे. संपादित होणार आहे. पुरंदर उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत १४६.९० हे. क्षेत्र खासगी आणि वन विभागाची ३.५६ हे. संपादित होणार आहे. खेड (राजगुरुनगर) उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत खासगी २८८.९५ हे., गायरान जमीन ३.८ हे. आणि इतर विभागाची साडेआठ हे क्षेत्र संपादित होणार आहे.

### प्रकल्पबाधितांना अधिक मोबदला

मावळ, मुळशी, हवेली, भोर, खेड आणि पुरंदर तालुक्यांतून पूर्व आणि पश्चिम वर्तुळाकार रस्ता जात आहे. या प्रकल्पात ८३ गावे बाधित होणार आहेत. त्यातील ७७ गावांतील मोजणी पूर्ण झाली आहे. भूसंपादनासाठी आवश्यक पहिल्या टप्प्यातील २५० कोटी रुपये मंजूर झाले असून हा निधी प्राप्तही झाला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष भूसंपादन प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. त्यात चालू बाजार मूल्यदर (रेडीरेकनर) दर, गेल्या पाच वर्षांत झालेले व्यवहार, या भागातील अन्य प्रकल्पाला दिलेला दर यापैकी जो अधिक असेल तो दर दिला जाणार आहे, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.
प्रकल्पाचा आढावा

### 84 पैकी 77 गावांतील मोजणी पूर्ण

- खासगी जागा १६०१.२९ हे., शासकीय जागा ११.५७ हे.
- वन विभागाची जागा १४७.५२ हे.
- शासनाकडील उपलब्ध जागा ३५.७४ हे.
- प्रकल्पांची लांबी १७३.७३ कि.मी.
  (पूर्व ६८.८ कि.मी., पश्चिम १०४.९ कि.मी.)
- प्रकल्पाची किंमत ३९,३७८.७८ कोटी रुपये

# महिलेवर लैंगिक अत्याचार करून फसवणूक

## दोघांना अटक : 66 लाख रुपयांच्या फसवणूक केल्याचा प्रकार

**। पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी : देहू रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेचे लैंगिक शोषण करून जमीन खरेदी प्रकरणात ६६ लाखांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी तीन जणांविरुद्ध एफआयआर नोंदवला असून त्यापैकी दोघांना अटक केली आहे. ही घटना 10 जुलै 2021 ते 6 जानेवारी 2022 दरम्यान घडली आहे.



याप्रकरणी प्रदीप फक्कड कोळी (वय 30, रा. तळेगाव दाभाडे), अंकुश सोनवणे, देवा विलास सोनवणे (वय 32, रा. पवनानगर, मावळ) यांच्याविरुद्ध देहू रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आयपीसी कलम ३७६, ४०६, ४२० आणि १२०बी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यांप्रकरणी ३३ वर्षीय पीडितेने गुरुवारी (२९ सप्टेंबर) फिर्याद दिली.

यांप्रकरणी पोलिसांनी प्रदिप कोळी आणि देवा सोनवणे यांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अंकुश सोनवणे आणि प्रदीप कोळी यांनी पीडितेला पवनानगर येथील जमीन चांगली असून, तिची एफडी तोडून या मालमत्तेत गुंतवणूक करावी, असे सांगितले. तसेच प्रदीप कोळी याने पीडितेला हा प्रकार कोणाला सांगितल्यास एक दिवस तिला व तिच्या मुलीला गायब करू, अशी धमकी दिली.

पीडित महिलेने एफडी तोडून जमिनीत गुंतवणूक केली. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात 7/12 आला तेव्हा तक्रारदाराने दाखवलेली जमीन आणि 7/12 वरील जमीन वेगळी असल्याचे लक्षात आले.

याबाबत अंकुश सोनवणे यांना विचारणा केली असता त्यांनी माहित नसल्याचे सांगून हा सर्व प्रकार प्रदीप कोळी हाताळत असल्याचे सांगितले. यानंतर प्रदीप कोळी याने महिलेच्या घरी येऊन पीडित महिलेला लग्नाची मागणी घातली आणि फिर्यादीचे घर आपल्या नावावर करण्याची धमकी देऊन तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

जमिनीच्या व्यवहाराच्या बहाण्याने आरोपीने महिलेची 66 लाख रुपये घेऊन फसवणूक केली. शारीरिक अत्याचार आणि आर्थिक फसवणुकीमुळे महिलेला मानसिक धक्का बसला होता. यातून सावरल्यानंतर तिने गुरुवारी (29 सप्टेंबर) फिर्याद दिली.

पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक गावडे करीत आहेत.

## शॉर्ट न्यूज

### कात्रज-कोंढवा रस्त्याच्या भूसंपादनासाठी दोनशे कोटींची मागणी



।पुणे। महाईन्यूज ।

भूसंपादनाअभावी रखडलेल्या कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी राज्य शासनाने दोनशे कोटींचा निधी द्यावा, अशी मागणी करणारा प्रस्ताव महापालिकेकडून करण्यात आला आहे. हा प्रस्ताव येत्या काही दिवसांत राज्य शासनाकडे पाठविला जाणार आहे. कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी सध्या भूसंपादनासाठी ७०० कोटींची आवश्यकता आहे. निधी अभावी रस्त्याचे काम रखडले आहे. या रस्त्यांच्या रुंदीकरणाला मंजुरी देताना रस्त्याची रुंदी ८४ मीटर एवढी प्रस्तावित करण्यात आली होती. मात्र रस्त्याची रुंदी ५० मीटर एवढी करण्यात येणार आहे. त्यामुळे रस्त्यासाठी भूसंपादनही कमी करावे लागणार असून त्यासाठी २७७ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी दोनशे कोटींचा निधी राज्य शासनाने महापालिकेला द्यावा, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे. भूसंपादन विभागाकडून तसा प्रस्ताव तयार करण्यात आला .

# सरपंचासह ग्रामसेवक लाच घेताना ACB च्या जाळ्यात...

## मावळ तालुक्यात (जि.पुणे) कुसगाव खुर्द ग्रामपंचायत कार्यालयातच लाचेची कारवाई

।पिंपरी। महाईन्यूज ।

**गेल्या वर्षभरापासून पिंपरी-चिंचवडसह व लगतच्या मावळ तालुक्यात लाचखोरीचे प्रमाण वाढत चालले आहे. गेल्या महिन्यात २४ तारखेला महावितरणच्या भोसरी उपविभाग कार्यालयातील कनिष्ठ अभियंता संतोषकुमार गित्ते याला पन्नास हजार रुपयांची लाच घेताना पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) पकडले होते. तर, ३ ऑगस्टला पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सर्व्हेअर संदीप लबडे याला तीन लाखांची लाच मागितली म्हणून त्यांनी अटक केली होती, त्यानंतर आज मावळ तालुक्यात (जि.पुणे) कुसगाव खुर्द ग्रामपंचायत कार्यालयातच त्यांनी लाचेची कारवाई (ट्रॅप) केली.**




कुसगाव खुर्द ग्रामपंचायतीचे सरपंच अनिल बाळू येवले (वय ३३) आणि ग्रामसेवक अमोल बाळासाहेब थोरात यांना आठ हजार रुपयांची लाच घेताना ग्रामंपंचायतीतच पकडण्यात आले. त्यानंतर पंचक्रोशीत खळबळ उडाली आहे. त्यांनी दहा हजार रुपये लाच मागितली होती. नंतर, आठ हजारावर तडजोड केली होती.

गावातील एका तरुणाच्या चुलत आजी, आजोबा यांचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यासाठी आरोपींनी ही लाच मागितली होती. तसेच या तरुणाच्या चुलत आजोबांच्या मृत्यू प्रमाणपत्रासाठी केलेला मागणी अर्ज व हरकत अर्जाच्या प्रती मिळण्याकरिता ग्रामपंचायतीकडे २६ तारखेला अर्ज केला होता. ते देण्यासाठी सरपंचांनी दहा हजार रुपये मागितले. ते घेण्यासाठी ग्रामसेवकाने त्यांना प्रोत्साहन दिले. म्हणून दोघांनाही एसीबीने आरोपी करण्यात आले आहे.

### कामशेत पोलिस ठाण्यात लाचखोरीचा गुन्हा दाखल!

**या तक्रारीची पुणे एसीबीने काल पडताळणी केली असता त्यात तथ्य आढळले. म्हणून त्यांनी सापळा लावला अन् त्यात लाच घेताना सरपंच आज सापडले. याबाबत कामशेत पोलिस ठाण्यात लाचखोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एसीबीच्या डीवायएसपी सीमा आडनाईक पुढील तपास करीत आहेत. शासकीय अधिकारी वा कर्मचाऱ्याने लाचेची मागणी केल्यास १०६४ या टोल फ्री नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन पुणे एसीबीचे डीवायएसपी (प्रशासन) श्रीहरी नाईक यांनी केले आहे.**

कुसगाव खुर्द ग्रामपंचायतीचे सरपंच अनिल बाळू येवले (वय ३३) आणि ग्रामसेवक अमोल बाळासाहेब थोरात यांना आठ हजार रुपयांची लाच घेताना ग्रामंपंचायतीतच पकडण्यात आले. त्यानंतर पंचक्रोशीत खळबळ उडाली आहे. त्यांनी दहा हजार रुपये लाच मागितली होती. नंतर, आठ हजारावर तडजोड केली होती.गावातील एका तरुणाच्या चुलत आजी, आजोबा यांचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यासाठी आरोपींनी ही लाच मागितली होती.

# श्रावण हर्डीकर होणार पुणे महापालिकेचे आयुक्त ?

## राज्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्याचा पहिला टप्पा पूर्ण

।पुणे। महाईन्यूज ।

**राज्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्याचा पहिला टप्पा गुरुवारी पूर्ण झाला. गुरुवारी 44 अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. दुसऱ्या टप्प्यात आणि अधिकाऱ्यांच्या बदल्या होण्याची शक्यता आहे. आयएएस अधिकाऱ्यांसोबतच आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या देखील होणार आहेत. आज किंवा येत्या दोन दिवसात या बदल्या होण्याची शक्यता आहे.**



या बदल्यांमध्ये पुण्यातून पुणे महापालिकेच्या आयुक्त विक्रमकुमार (Vikram Kumar), पुण्याचे विभागीय आयुक्त सौरभ राव (Saurabh Rao), पुण्याचे जिल्हाधिकारी राजेश देशमुख (Rajesh Deshmukh) आणि राज्याचे नोंदणी महानिरीक्षक श्रावण हर्डीकर यांची बदली होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात येत आहे.

गेल्या दोन वर्षांपासून विक्रम कुमार पुणे महापालिकेच्या आयुक्तपदावर काम करत आहेत. ते आधी ते पीएमआरडीएचे आयुक्त होते. तर सौरभराव हे गेली सात वर्ष पुण्यातच विविध पदांवर काम करत आहेत. पुण्याचे जिल्हाधिकारी, साखर आयुक्त, पुणे महापालिकेचे आयुक्त पदावर त्यांनी काम केलं असून आता ते पुण्याच्या विभागीय आयुक्त पदांवर कार्यरत आहेत. राजेश देशमुख यांची दोन वर्षाची जिल्हाधिकारी पदाची टर्म पूर्ण झालेली आहे. या सर्व बदल्यांमध्ये हर्डीकर, विक्रम कुमार, सौरभ राव आणि राजेश देशमुख या चौघांची बदली होणार की महापालिका निवडणुका होईपर्यंत हे सर्वजण पुण्यातच राहणार, हे येत्या काही दिवसात स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, या बदल्यामंध्ये आतापर्यंत यात महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांच्या नावाचा करण्यात आलेला नाही. पण लवकरच पुणे महापालिकेला नवीन आयुक्त मिळणाप असल्याची चर्चा आहे.

त्यामुळे यापूर्वी पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त राहिलेले आणि सध्याचे नोंदणी व मुद्रांक विभागाचे महानिरीक्षक श्रावण हर्डीकर यांची नवीन आयुक्तपदी नियुक्ती होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले असून, यावर मुख्यमंत्री न उपमुख्यमंत्री यांचे एकमत झाल्याचे माहिती मिळाली आहे.

# मुसळधार पावसामुळे शहरभर वाहतूक कोंडी

।पुणे। महाईन्यूज ।



मुसळधार पावसामुळे शुक्रवारी शहराच्या वेगवेगळ्या भागात कोंडी झाली. मोठ्या संख्येने मोटारी रस्त्यावर आल्याने कोंडीत भर पडली. शहरात बहुतांश रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत होऊन वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. शहरात शुक्रवारी (३० सप्टेंबर) दुपारी चारनंतर मुसळधार पाऊस सुरू झाला. तासभर कोसळलेल्या पावसामुळे पाणी साठल्याने वाहतूक विस्कळीत झाली. पावसामुळे अनेक चौकातील वाहतूक नियंत्रक दिवे पडल्याने वाहनांच्या रांगा लागल्या. झाडे कोसळल्यामुळे रस्ते वाहतुकीस बंद करण्यात आले. त्यामुळे प्रमुख रस्त्यांलगच्या गल्ली-बोळातून वाहनचालकांनी वाट काढली. शाळा आणि कार्यालये सुटण्याच्या वेळी झालेल्या पावसामुळे नोकरदार तसेच विद्यार्थ्यांची धावपळ उडाली. फर्ग्युसन रस्ता, गणेशखिंड रस्ता, जंगली महाराज रस्ता, कर्वे रस्ता, सिंहगड रस्ता, टिळक रस्ता, सातारा रस्ता, शंकरशेठ रस्ता, ससून रस्ता, नगर रस्ता, बंडगार्डन रस्त्यावरील वाहनांच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. शिवाजीनगर येथील पोलीस वसाहतीसमोर झाड कोसळल्याने या भागातील वाहतूक विस्कळीत झाली. झाडांच्या फांद्या रस्त्यावर पडल्याने वाहतुकीचा वेग कमालीचा संथ झाला होता. मुसळधार पावसामुळे शहरातील सर्व रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. खड्ड्यात साठलेल्या पाण्यामुळे वाहनचालकांना अंदाज येत नव्हता. पावसामुळे मोठ्या संख्येने मोटारी रस्त्यावर आल्याने कोंडीत भर पडली. सायंकाळी साडेसातनंतर

# सेवानिवृत्तीनंतर आरोग्यदायी जीवन जगा !

## अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप : महापालिकेतून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान

**पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य आरोग्य सांभाळून आनंदाने जगावे आणि आपली सेवानिवृत्ती ही नवीन चैतन्यमयी जीवनाची आवृत्ती ठरावी, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने माहे सप्टेंबर २०२२ अखेर सेवानिवृत्त होणा-या अधिकारी, कर्मचा-यांचा सत्कार अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते दिवंगत मधुकरराव पवळे सभागृह येथे करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.**



या कार्यक्रमास माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, माजी स्थायी समिती सभापती प्रशांत शितोळे, माजी नगरसदस्य भाऊसाहेब भोईर, कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनसंपर्क विभागाचे प्रफुल्ल पुराणिक, कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष शशिकांत उर्फ बबन झिंझुर्डे, सरचिटणीस अभिमान भोसले, कोषापाल नितीन समगीर, उपाध्यक्ष मनोज माछरे, चारुशीला जोशी, कर्मचारी महासंघाचे माजी अध्यक्ष अंबर चिंचवडे तसेच कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नातेवाईक उपस्थित होते.

माजी नगरसदस्य भाऊसाहेब भोईर यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांना आरोग्य जपून आपले संगीत, कला यासारखे आवडते छंद जोपासावे असे मार्गदर्शन केले.

माहे सप्टेंबर २०२२ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या अधिकारी आणि कर्मचा-यांमध्ये सह शहर अभियंता सतिश इंगळे, लेखाधिकारी पद्माकर कानिटकर, कार्यालय अधिक्षक नरेंद्र दुराफे, महाद्रग वाघेरे, उपलेखापाल राजेंद्र धाकड, सिस्टर इनचार्ज संगीता पाटील, वायरलेस ऑपरेटर राजश्री शेवाळे, उपशिक्षक रेहाना सय्यद, मंगला लोखंडे, अग्निशमन विमोचक जयराम कदम, सुरक्षा सुपरवायझर कालिदास वाल्हेकर, रखवालदार आनंदा जगताप, शिपाई प्रमोद पाटील, मजूर खलील शेख अब्दुलगणी, आनंदराव शिंदे, अरुण सोनवणे, सफाई कामगार लता कांबळे, सुमन नवले, संजीवनी भोसले, सफाई सेवक ओमबत्ती वाल्मिकी, आया सायरा पठाण यांचा समावेश आहे.

तसेच सप्टेंबर २०२२ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचा-यांमध्ये सफाई कामगार सुरेखा मिसाळ, सफाई सेवक शेरसिंग कागडा, सुर्यकांत शेंडगे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

# खासदार बारणे एकविरा देवीच्या दर्शनाला दाखल

## भाविकांना आवाहन : उत्सावाला गालबोट नको, शांततेत दर्शन घ्या

**पिंपरी-चिंचवड। ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (शुक्रवारी) कार्ला येथील एकवीरा गडावर जात एकवीरादेवीचे दर्शन घेतले. गेली दोन वर्षे नवरात्र उत्सवावर कोरोना संसर्गाचे सावट होते. त्यामुळे साध्या पद्धतीने नवरात्र उत्सव साजरा करण्यात आला. यंदा कोरोना संसर्ग कमी झाल्याने उत्साही वातावरणात नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली. आई एकविरा देवीच्या मंदिरात घटस्थापना करण्यात आली आहे.**




दरवर्षीप्रमाणे खासदार श्रीरंग बारणे यांनी आज पाचव्यादिवशी कार्यकर्त्यांसह गडावर जात देवीचे दर्शन घेतले. त्यांच्यासोबत जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, मावळ तालुका प्रमुख राजेश खांडभोर, पिंपरी विधानसभेच्या महिला संघटिका सरिता साने, अंकुश देशमुख, राजेंद्र तरस, दत्ता केदारी, सुनील हुलावळे, अंकुश कोळेकर, दिपक गुजर, माऊली घोगरे, रोहित माळी, शैला पाचपुते आदी पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, "मागील दोन वर्ष कोरोनामुळे देवीचा नवरात्र उत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्यात आला होता. यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने महाराष्ट्रातील जागृत देवस्थान असलेल्या कार्ला (लोणावळा) गडावरील आई एकविरा देवीच्या मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केल जात आहे. देवीचे मंदिर व चौघड्यांला आकर्षक फुलांचे डेकोरेशन करण्यात आले असून गड परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. राज्याच्या कानाकोप-यातून देवीचे दर्शन घेण्यासाठी भाविक गडावर येत आहेत. भाविकांनी शांततेत दर्शन घ्यावे. गोंधळ करु नये, उत्सवाला गालबोट लागेल असे कोणी वागू नये. शांतता पाळावी" असे आवाहनही त्यांनी भाविकांना केले.

### गोंधळ करु नये, उत्सवाला गालबोट नको

**खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, "मागील दोन वर्ष कोरोनामुळे देवीचा नवरात्र उत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्यात आला होता. यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने महाराष्ट्रातील जागृत देवस्थान असलेल्या कार्ला (लोणावळा) गडावरील आई एकविरा देवीच्या मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केल जात आहे. देवीचे मंदिर व चौघड्यांला आकर्षक फुलांचे डेकोरेशन करण्यात आले असून गड परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. राज्याच्या कानाकोप-यातून देवीचे दर्शन घेण्यासाठी भाविक गडावर येत आहेत. भाविकांनी शांततेत दर्शन घ्यावे. गोंधळ करु नये, उत्सवाला गालबोट लागेल असे कोणी वागू नये. शांतता पाळावी" असे आवाहनही त्यांनी भाविकांना केले.**

## संपादकीय

# भारत जोडो; काँग्रेस तोडो?

***काँग्रेससारखा प्रदीर्घ, उज्ज्वल परंपरा असणारा पक्ष इतक्या पोरकटपणे चालत असेल तर विरोधकांचे सकल ऐक्य साकारणा कसे आणि त्यात काँग्रेसला अध्वर्यू म्हणून कोण मान देणार, हा प्रश्नच आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार विरोधी ऐक्यासाठी बरेच झटत असून काँग्रेसला सोबत घ्यायला हवे, हा त्यांचा आग्रह चूक नाही.***

काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी पक्षाचा जो खेळखंडोबा चालवला आहे; तो पाहिल्यावर या पक्षाला शत्रूची गरज आहे का, असाच प्रश्न कुणालाही पडेल. राजस्थान हे काँग्रेसच्या ताब्यात असणारे एकमेव मोठे राज्य आहे. आता अध्यक्षपदाच्या निमित्ताने ते सरकारही आवर्तात सापडावे, यासारखे पक्षाचे दुर्दैव नाही. कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र या राज्यांतली पुरती किंवा आघाडीतील सत्ता आधीच गेली आहे. उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, महाराष्ट्र या मोठ्या राज्यांमधून काँग्रेसची सतत पीछेहाट होते आहे. अशावेळी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गहलोत यांना अस्थिर किंवा नाराज करून काँग्रेस पक्षश्रेष्ठ नेमके काय साधणार आहेत? एकीकडे, नितीश कुमार, लालूप्रसाद यांच्यासारखे विरोधी पक्षांचे नेते सोनिया गांधी यांना भेटून विरोधी ऐक्यासंबंधी बोलणी करीत आहेत. दुसरीकडे, पक्षाचा संभाव्य अध्यक्ष म्हणून नाव चर्चेत असणाऱ्या नेत्याचेच पाठीराखे केंद्रीय पक्षनेत्यांना बंडाचे निशाण दाखवतात. 'ही बंडाळी आपणास माहीत नव्हती आणि जे झाले त्याबद्दल मी माफी मागतो,' असे राजस्थानाचे मुख्यमंत्री अशोक गहलोत म्हणाल्याचे मध्यस्थ काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या हवाल्याने आता सांगितले जाते.

गहलोत यांच्या या विधानावर शाळकरी मूलही विश्वास ठेवणार नाही. 'आमचा मुख्यमंत्री बदलाल किंवा आम्हाला हवा तो विधीमंडळ नेता न द्याल तर खबरदार,' असा इशारा ९० आमदार पक्षश्रेष्ठांना देतात आणि ते मुख्यमंत्र्याला माहीतही नसेल; तर असा कुचकामी नेता पक्षाचा केंद्रीय अध्यक्ष म्हणून काय दिवे लावणार? गांधी कुटुंबीयांना पक्षात सत्तापद नको आहे; मात्र, पक्षाची खरी, आंतरिक सत्ता सोडायची नाही, हा जबरदस्त विरोधाभास हेच या साऱ्या समस्यांचे मूळ कारण आहे. उद्या सोनिया, राहुल किंवा प्रियांका यांचे आदेश ऐकत ऐकतच नामधारी अध्यक्षपद सांभाळायचे असेल तर त्यापेक्षा जयपूरची सुभेदारी परवडली, असे गहलोत यांना वाटल्यास नवल नाही. काही दिवसांपूर्वी 'एक नेता एक पद' ही चर्चा सुरू झाली, तेव्हाच संभाव्य कटकटींचा सुगावा लागला होता. लहर येईल तेव्हा नर्मदा परिक्रमा करायची आणि लहर असेल तेव्हा पक्षांतर्गत आगीत तेल टाकायचे, असे वागणाऱ्या दिग्विजय सिंह यांनी याची सुरुवात केली. मागे राजस्थानात बंडाळी झाली, तेव्हा पक्ष सोडून चाललेल्या सचिन पायलट यांना म्हणे पक्षश्रेष्ठांनी (म्हणजे कोण?) थांबविले आणि मुख्यमंत्रीपदाचे आश्वासन दिले.



## आनंदी सकाळ

### माणसांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह

अलीकडे संशयकल्लोळ वाढला आहे. प्रत्येक ठिकाणी अप्रामाणिकता वाढल्याने बहुतांशी व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. अशा वेळी माणसांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याने निर्जीव यंत्रावर अवलंबून राहावे लागते. त्यातून संशय आला की, सीसीटीव्ही, जीपीएस, कॉल रेकॉर्डिंग, चॅटिंग, एसएमएस असे डिजिटल तंत्रज्ञान पुरावा म्हणून वापरले जाते. हे कोणत्याही व्यक्तीच्या प्रतिष्ठेस शोभणारे नाही. संशयमुक्त जगायचे असेल तर मन साफ ठेवावे. प्रीती, प्रेमाला मनात जागा दिली आणि ज्ञान व प्रामाणिकतेला प्राधान्य दिले तर संशयी स्वभाव निश्चितच कमी होईल. प्रत्येक इंद्रियाच्या व्यवहारात प्रामाणिकतेची प्रतिष्ठापना केली तर हा स्वभाव दूर होईल. मात्र, ऐकलेले, वाचलेले पारखून घेण्याची सवय लागून घेण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतील, हेही निश्चित.




# दुखणे मोठे, दिलासा तात्पुरता



आगामी काळात मागणी आणि पुरवठ्यानुसार सिनेमागृहे त्यांची तिकिटे कमी-अधिक करू शकतात. कारण, आज 'ओटीटी'सारखे सिनेमा प्रदर्शनाचे सक्षम साधन सिनेनिर्मात्यांच्या हाती असल्याने एकूण सिनेनिर्मितीतील वीस-तीस टक्के सिनेमे थेट ओटीटीचा मार्ग धरताना दिसत आहेत. या स्थितीत तिकिटांच्या किमती कमी करणे हा एक उपाय असू शकतो हे या प्रयोगाने दिसून आले.

गेले काही महिने चित्रपटगृहांपासून दुरावलेल्या प्रेक्षकांना पुन्हा एकदा ७० एमएमची भुरळ पाडण्यासाठी राष्ट्रीय सिनेमा दिनाचा एक अनोखा प्रयोग सिनेसृष्टीने २३ सप्टेंबरला करून पाहिला. केवळ ७५ रुपयांमध्ये चित्रपट पाहाण्याची संधी या निमित्ताने प्रेक्षकांना देण्यात आली. आश्चर्य म्हणजे सिनेनिर्मात्यांचा हा प्रयोग तिकीट खिडकीवर 'हाउसफुल्ल' ठरला. सगळे प्रयोग करूनही प्रेक्षक सिनेमागृहांकडे येत नसल्यामुळे भविष्यात सिनेमागृहेही इतिहासजमा होणार, ओटीटीच्या वादळापुढे सिनेमागृहांचा टिकाव लागणे आता अशक्य आहे या मतापर्यंत आलेल्या मनोरंजनसृष्टीतील अनेकांना आता आशेचा नवा किरण दिसू लागला आहे. 'ब्रह्मास्त्र' चित्रपटाने आता २६ ते २९ सप्टेंबर दरम्यात तिकिटांचे दर १०० रुपये ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढेही तिकिटांचे दर असेच ठेवा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. भविष्यात प्रेक्षक टिकवण्यासाठी सिनेसृष्टी कोणती पावले उचलते यावर त्यांची भविष्यातील वाटचालही अवलंबून असणार आहे.

प्रेक्षक सिनेमा पाहण्यासाठी नक्कीच सिनेमागृहापर्यंत येऊ शकतात हे यानिमित्ताने अधोरेखित झाले. परंतु आता तिकीट दर पुन्हा पूर्ववत झाल्यांनतर शनिवार, रविवारी सिनेमागृहावरील प्रेक्षकांची गर्दी ओसरली. त्यामुळे आता हा 'किमान' किमतीचा प्रयोग दररोज करण्याबाबत सिनेनिर्माते आणि सिनेमागृह व्यावसायिकांमध्ये चर्चा रंगत आहे. हा उपक्रम नव्या स्वरूपात कसा राबवला जाऊ शकतो, याबाबत विचारविनिमय सिनेसृष्टीने करणे गरजेचे. यात प्रत्येक सिनेमागृहात प्रत्येक सिनेमाचा दिवसातील किमान एक खेळ (शो) ७५ रुपये किंवा कमी तिकीट दरात उपलब्ध करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे असू शकते का? किंवा सवलतीच्या दरात मासिक तिकिट सुरू करणे या पर्यायांचा विचार सिनेव्यावसायिकांनी करणे गरजेचे आहे. सोबतच प्रेक्षक सिनेमागृहांकडे न येण्याच्या कारणांचाही शोध घेणे आवश्यक आहे. प्रेक्षक सिनेमागृहात चित्रपट पाहण्यासाठी न येण्यामागचे कारण चित्रपटांच्या ढासळणाऱ्या दर्जासोबतच (अपवाद वगळता) तिकिटांचे चढे दर हेही आहे. सध्या बहुपडदा सिनेमागृहांमध्ये एका व्यक्तीचे तिकीट हे २५० ते अगदी एक हजार रुपयांपर्यंत जाते. मध्यंतरामध्ये खाण्याचे दर पाहूनच अनेकांचे पोट भरते. त्यामुळे चार जणांच्या कुटुंबांने एकत्रित चित्रपट पाहायला म्हटला तर किमान दोन ते अडीच हजार रुपये खर्च होतात.

# पाक-अफगाण संघर्ष कशामुळे?

**टी ट्वेंटी क्रिकेटच्या आशिया करंडक स्पर्धेतील एका सामन्यात अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्या प्रेक्षकांत हाणामारी झाली. उभय देशांत खेळाच्या मैदानावरच नव्हे, तर प्रत्यक्षातही वादाचे प्रसंग वाढले आहेत. यामागील कारणे जाणणे भारतासाठीही महत्त्वाचे ठरते.**

टी ट्वेंटी क्रिकेटच्या आशिया करंडक स्पर्धेतील एका सामन्यात अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्या प्रेक्षकांत हाणामारी झाली. एके काळचे खास मित्र हाणामारी का करतात असा प्रश्न अनेकांना पडला असेल. मात्र, यातूनच त्यांच्यातील वादाची कल्पना येऊ शकेल. उभय देशांत खेळाच्या मैदानावरच नव्हे, तर प्रत्यक्षातही वादाचे प्रसंग वाढले आहेत.पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील वादाचे मूळ कारण १८९३ साली इंग्रजांनी सीमा आखण्यासाठी लादलेल्या ड्युरँड रेषेत आहे. अफगाणिस्तान ब्रिटिश साम्राज्याच्या वसाहतीत नव्हता. अविभाजित भारताची सीमा ठरवण्यासाठी ड्युरँड रेषा तत्कालीन अमीर यांच्यावर लादण्यात आली. हा प्रदेश पठाण जमातींचा आहे. सीमारेषा नकाशावर आखली गेली असली, तरी प्रत्यक्षात रेषेच्या दोन्ही बाजूंनी येण्या-जाण्यात अडथळे नव्हते. तसेच, तेथील जमातींचे संबंध सुरळीत



राहिले. या प्रदेशात इतर सत्तांना विशेषतः रशियाला येऊ द्यायचे नाही आणि त्याद्वारे आपला मैदानी प्रदेश सुरक्षित ठेवायचा, हा एकमेव उद्देश त्या मागे होता.

ब्रिटिशांनी वायव्य सरहद्द प्रांत (आजचे खैबर पख्तुनख्वा) शासन स्थापन केले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर अफगाणिस्तानने सर्व पठाण जमातींचा पख्तुनिस्तान प्रदेश स्वतंत्र स्थापन करावा, अशी मागणी केली; परंतु त्याकडे कोणी लक्ष दिले नाही. खरी समस्या सुरू झाली ती १९७९मध्ये, अफगाणिस्तानात सोव्हिएत रशियाने हस्तक्षेप केल्यानंतर. अमेरिका-रशियाच्या शीतयुद्धात ही सीमा एक महत्त्वाची आघाडी झाली. सोव्हिएत फौजांनी १९८९मध्ये माघार घेतली. त्यामुळे तिथल्या पोकळीत तालिबानी संघटनांनी सत्ता काबीज केली. पुढे अमेरिकेवर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर अमेरिकेने अफगाणिस्तानात सैन्य पाठविले. हे सैन्य गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये परतले. आता अफगाणिस्तानात तालिबानची राजवट आहे. या सत्ताधाऱ्यांनी मध्ययुगीन धार्मिक निर्बंध लावले असून, स्त्रियांचे सर्व अधिकार काढले आहेत. त्यांच्या शासनाला बहुतेक देशांनी अधिकृत मान्यता दिलेली नाही. पाकिस्तानला या घडामोडींचे परिणाम सोसावे लागत आहेत.या कुटुंब व्यवस्थेचे मोदींनी याच भाषणात कौतुकही केले.

हा एका परीने त्यांच्या भाषणातील अंतर्विरोध होता. तोही स्वाभाविकच आहे. याचे कारण, भारतीय समाज आणि संस्कृतीचे काही प्रवाह असेच अंतर्विरोधांनी भरलेले आहेत. तसे अंतर्विरोध नसते, तर 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' म्हणणाऱ्या समाजात 'महिलांना समान अधिकार, समान सन्मान मिळालाच पाहिजे,' हे इतक्या ठासून का सांगावे लागले असते?

## ।। अभंगवाणी ।।



वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती ।
जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ॥१॥
भाडेकरी वाहे पाठीवरी भार ।
अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### आंबा घाटात ट्रक डोंगरकड्यावर आदळल्याने एक ठार



। रत्नागिरी। महाईन्यूज ।

कोल्हापूर- रत्नागिरी महामार्गावरील आंबा घाटात ट्रक डोंगरकडय़ावर आदळून झालेल्या अपघातात एक महिला ठार झाली असून अन्य एकजण गंभीर जखमी झाले आहेत. ट्रकचा चालक फरार आहे. याबाबतची माहिती अशी की, गुरुवारी रात्री कोल्हापूरहून जयगडकडे चाललेल्या ट्रकमध्ये (एमएच ११- डी डी ०९६७) रत्नागिरीकडे जाणारे काही प्रवासी बसले होते. ट्रक आंबा घाटात आला असता एका वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रक घाटातील डाव्या बाजूच्या डोंगरकडय़ावर जोरात आदळला. ट्रकच्या केबिनमध्ये बसलेल्या महिला सोनाबाई सखाराम लावनदे (वय ५८ वर्षे) या अपघातामध्ये ठार झाल्या, तर ज्योतिबा बाबुराव लवनदे, (वय ५२) गंभीर जखमी झाले आहेत.

## “राज ठाकरेंनी दौरे काढले तर... तुम्हाला काय त्रास होतो?”

### अजित पवारांनी घेतली राज ठाकरेंची बाजू




। मुंबई । महाईन्यूज ।

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नुकत्याच झालेल्या विदर्भ दौऱ्यावरुन तसेच नियोजित कोकण दौऱ्यावरुन विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पुण्यामध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना भाष्य केलं आहे. विशेष म्हणजे अनेकदा एकमेकांवर अप्रत्यक्षपणे टीका करणाऱ्या या दोन्ही नेत्यांपैकी अजित पवार यांनी यावेळी अप्रत्यक्षपणे राज यांची बाजू घेतल्याचं पहायला मिळालं. अजित पवार यांनी दसरा मेळाव्याला कोणाचं भाषण आधी पाहणार, अब्दुल सत्तार यांनी डायनासॉर म्हणत केलेली टीका यासारख्या प्रश्नांनाही उत्तरं दिली.

अजित पवार यांना राज यांच्या दौऱ्यांसंदर्भात पत्रकारांनी प्रश्न विचारला. या प्रश्नाला उत्तर देताना विरोधीपक्ष नेत्यांनी दौरे काढणं हा राज यांचा अधिकार असल्याचं म्हटलं. “राज ठाकरे यांनी दौरे काढले तर तुम्हाला काय त्रास होतो? प्रत्येक पक्षाच्या नेत्याला राज्यात दौरे काढण्याचा अधिकार आहे. मतदारांना ज्याची भूमिका पटेल, त्याच्या पाठिशी लोक उभे राहतील,” असे अजित पवार यांनी राज यांच्या विदर्भ दौरा आणि प्रस्तावित कोकण दौऱ्याबाबतच्या प्रश्नाला उत्तर देताना भाष्य केले. ‘शिवाजी पार्क मैदानावर शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांची, तर बीकेसी मैदानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

# शिंदे गटाकडून युवासेनेची कार्यकारिणी जाहीर!

### राज्यभरात नेमले नवे पदाधिकारी

। मुंबई । महाईन्यूज ।

शिवसेना पक्षातील बंडखोरीनंतर शिंदे गट आणि उद्धव ठाकरे समर्थकांमध्ये टोकाचा संघर्ष पाहायला मिळतोय. आम्हीच खरी शिवसेना आहोत, असा दावा दोन्ही गटांकडून केला जातोय. हा वाद आता न्यायालय आणि निवडणूक आयोगापर्यंत गेला आहे. असे असताना एकनाथ शिंदे गटाने युवासेनेची कार्यकारिणी जाहीर केली आहे. शिंदे गटाने उत्तर महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात तसेच राज्यभरात वेगवेगळ्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. युवासेनेची कार्यकारिणी जाहीर केल्यानंतर शिंदे गटाचे प्रवक्ते किरण पावसकर यांनी अधिक माहिती दिली आहे. शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांच्यासोबत युवासेनेत काम करणारे तरुण आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत आले आहेत. मुंबईची जबाबदारी समाधान सरवणकर यांच्याकडे असेल. विविध विभागात वेगवेगळे तरुण काम करतील, असे पावसकर यांनी सांगितले.



### दसरा मेळाव्यासाठी दोन्ही गटांकडून शक्तिप्रदर्शन

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्हाची लढाई न्यायालय, निवडणूक आयोगात सुरू असताना दोन्ही गटांकडून दसरा मेळाव्याच्या माध्यमातून शक्तिप्रदर्शन करण्यात येत आहे. शिंदे गटाचा दसरा मेळावा बीकेसी मैदानावर होणार आहे. तर उद्धव ठाकरे गटाचा मेळावा शिवाजी मैदानावर घेण्यात येणार आहे. दोन्ही गटांनी या मेळाव्याचे टीझर, पोस्टर प्रदर्शित केले आहे. यामध्ये आम्हीच खरी शिवसेना आहोत, याचा पुरेपूर प्रयत्न दोन्ही गटांकडून करण्यात आला आहे.



# स्वच्छ महाराष्ट्र अभियान 2.0 सुरू

### मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छ शहरं तयार करण्यासाठी एक नवीन पाऊल

। मुंबई । । महाईन्यूज ।

> उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले “स्वच्छ महाराष्ट्र अभियान 2.0 याची आज सुरुवात झाली आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत साडेबारा हजार कोटी रुपायांचा एक मोठा आराखडा मंजूर केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रामधील सर्व शहरांमध्ये स्वच्छता, नवीन सार्वजनिक शौचालयांची निर्मिती, सर्व प्रकारच्या घनकचऱ्याची प्रक्रिया, सांडपाणी प्रक्रिया असे सर्व कार्यक्रम खूप मोठ्याप्रमाणावर होणार आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या कार्यक्रमात आज(शुक्रवार) स्वच्छ महाराष्ट्र अभियान 2.0 चा शुभारंभ झाला. या कार्यक्रमानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना फडणवीसांनी याबाबत थोडक्यात माहिती दिली.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले “स्वच्छ महाराष्ट्र अभियान 2.0 याची आज सुरुवात झाली आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत साडेबारा हजार कोटी रुपायांचा एक मोठा आराखडा मंजूर केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रामधील सर्व शहरांमध्ये स्वच्छता, नवीन सार्वजनिक शौचालयांची निर्मिती, सर्व प्रकारच्या घनकचऱ्याची प्रक्रिया, सांडपाणी प्रक्रिया असे सर्व कार्यक्रम खूप मोठ्याप्रमाणावर होणार आहेत. तंत्रज्ञानाचा उपयोग होणार आहे. स्वच्छ शहरं तयार करण्यासाठी एक नवीन पाऊल आज मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकारने उचललं आहे.” तर सेंट्रल व्हिस्टा वरून विरोधकांकडून होत असलेली टीका व यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेच्या पार्श्वभूमीवर बोलताना फडणवीसांनी “सेंट्रल व्हिस्टा हा आयकॉनिक प्रोजेक्ट आहे आणि तो देशाचा मानबिंदू आहे. या मानबिंदूला नुकसान पोहचवण्याचं किंवा त्यामध्ये अडसर निर्माण करण्याचा प्रयत्न कोणीही केला नाही पाहिजे.” असं यावेळी सांगितलं.

करोना साथीच्या पहिल्या लाटेदरम्यान भारतातील परिस्थिती अत्यंत भीषण होती. या काळातही सरकारकडून ‘सेंट्रल व्हिस्टा’ प्रकल्पाचे काम सुरू होते. यावर विरोधकांकडून सरकारची कोंडी करण्यात येत होती. याविरोधात न्यायालयात याचिकादेखील दाखल करण्यात आल्या होत्या. केंद्र सरकारने या विरोधानंतरही काम सुरुच ठेवले होते. बांधकाम करणाऱ्या कामगारांची प्रकल्पाच्या परिसरातील ठिकाणीच राहण्याची सोय करण्यात आली होती.

# संजय राठोडांना धक्का देत सुनील महाराज शिवसेनेत!



। वाशीम । महाईन्यूज ।

मंत्री संजय राठोडांना धक्का देत पोहरादेवी गडातील बंजारा समाजाचे महंत सुनील महाराज यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. बंजारा समाजाची काशी म्हणून परिचित असलेल्या पोहरादेवी गडातील बंजारा समाजाचे सुनील महाराज हे महंत आहेत. त्यांनी आज शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधले.मागील काही दिवसांपासून महंतासह बंजारा समाजाचे काही बांधव शिवसेनेत जाण्याच्या चर्चा रंगू लागल्या होत्या. यातील महत्त्वाची चर्चा आज खरी ठरली आहे. या नवीन घडामोडीमुळे बंजारा समाजाच्या ‘काशी’तील राजकीय गणिते बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्वत: सुनील महाराज यांनी शिवसेनेत जाण्याबाबत माहिती दिली होती.

अखेर आज त्यांनी मुंबई येथे उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश केला. बंजारा समाजाची काशी म्हणून पोहरादेवी सर्वश्रूत आहे. येथील महंतांना बंजारा समाजात मोठे स्थान आहे. बंजारा समाजाचे मंत्री संजय राठोड यांना शह देण्यासाठी शिवसेनेने महंत सुनील महाराज यांना शिवसेनेत घेऊन जोरदार धक्का दिल्याचे बोलले जात आहे.

# युक्रेनचे चार प्रदेश रशियात विलीन!

## पुतिन यांची करारावर स्वाक्षरी; युक्रेन

**। मॉस्को । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

युक्रेनचे चार प्रांत विलीन करण्याच्या करारावर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी स्वाक्षऱ्या केल्या. युक्रेन, अमेरिका आणि युरोपीय महासंघाने याबाबत संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. आंतरराष्ट्रीय कायदा धाब्यावर बसवून केलेले हे अनधिकृत विलीनीकरण कधीही मान्य करणार नाही, अशी भूमिका पाश्चिमात्य राष्ट्रांनी घेतली.

रशियाने युद्ध करून ताब्यात घेतलेल्या डोनेस्क, लुहान्स्क, खेरसन आणि झापोरीझिया या युक्रेनच्या प्रांतांमध्ये सार्वमत घेतले होते. या रशियापुरस्कृत सार्वमतामध्ये नागरिकांनी रशियात समावेशाचा कौल दिल्याचा निकाल रशियाधार्जिण्या अधिकाऱ्यांनी जाहीर केला. त्यानंतर तीनच दिवसांनी क्रेमलिन प्रासादातील जॉर्ज सभागृहात मोठा सोहळा करत पुतिन यांनी हे प्रांत रशियात समाविष्ट करत असल्याचा करार या प्रांताच्या अधिकाऱ्यांसोबत केला. यावेळी त्यांनी पाश्चिमात्य राष्ट्रांवर टीका केली. "बाल्टिक समुद्राखालून जाणारी रशिया-जर्मनी वायुवाहिनीच्या २ वाहिन्यांवर हल्ले झाले. ऊर्जेसाठी युरोपात असलेल्या पायाभूत सुविधा नष्ट करण्याचा हा कट आहे. ज्यांना यातून फायदा आहे, त्याच देशांनी हे घडवून आणले आहे," असा आरोप करताना त्यांनी कोणत्याही देशाचे नाव घेणे मात्र टाळले. युक्रेनसह पाश्चिमात्य राष्ट्रांनीही पुतिन यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. "युक्रेनचे भवितव्य हे युद्धभूमीतच निश्चित होईल. रशियाने बळकावलेला भाग परत घेण्याची आमची मोहीम सुरूच राहील. औषधाच्या गोळ्या खाण्याचा



### वायुवाहिनीमध्ये घातपात

**बाल्टिक समुद्राखालून गेलेल्या रशिया-जर्मनी वायुवाहिनीमध्ये स्फोट झाले असून त्यातून मिथेन वायूची गळती होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. डेन्मार्क आणि स्वीडनने काही शे किलो स्फोटकांचा वापर केला गेला असण्याची शक्यता वर्तवली. रशियाने या समस्येवर मार्ग काढण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची तातडीची बैठक बोलावून या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.**

ज्यांचा काळ आहे, अशांकडे आम्ही लक्ष देत नाही," असे युक्रेन राष्ट्राध्यक्ष कार्यालयाचे प्रमुख अँड्री येर्माक यांनी खडसावले. तर युरोपीय महासंघाच्या सदस्यांनी संयुक्त पत्रकाद्वारे रशियाने केलेले विलीनीकरण नाकारत असल्याचे सांगत या कृतीचा निषेध केला.

# अफगाणिस्तान : काबूलमधील शाळेत बॉम्बस्फोट




**।काबूल ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तानची राजधानी काबूलमधील एका शाळेत आज सकाळी बॉम्बस्फोट झाला आहे. या बॉम्बस्फोटात १९ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती असून हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, अद्यापतरी कोणत्याही संघटनेने या बॉम्बस्फोटाची जबाबदारी घेतलेली नाही. पश्चिम काबूलमधील दश्त-ए-बर्ची येथे एका शाळेत काही विद्यार्थी परीक्षेची तयारी करत होते. यावेळी मोठा स्फोट झाला. यात १९ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून २७ जणं जखमी झाले आहेत, अशी माहिती पोलीस अधिकारी खालिद जद्रान यांनी दिली आहे.

दरम्यान, सुरक्षा पथके घटनास्थळी पोहोचली असून हल्ल्याचे स्वरूप आणि मृतांचा तपशील आम्ही नंतर जाहीर करू, अशी प्रतिक्रिया गृह मंत्रालयाचे अब्दुल नाफी टाकोर यांनी दिली. तसेच "नागरी वस्तीवर हल्ला करणे हे अमानवीय असून या घटनेचा आम्ही निषेध करतो, असेही ते म्हणाले.


गेल्या वर्षी अफगाणिस्तानमध्ये तालिबान पुन्हा सत्तेत आल्यानंतर दोन दशकांपासून सुरू असलेल्या युद्धाचा अंत झाला होता. त्यानंतर हिंसाचाराच्या घटनेत लक्षणीय घट झाली होती. मात्र, अलिकडच्या काही महिन्यांत अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे. या महिन्यात २३ सप्टेंबर रोजी अफगाणिस्तानची राजधानी काबूलमध्ये एका मशिदीजवळ हा स्फोट झाला होता. यात ४ जणांचा मृत्यू झाला होता. तर त्यापूर्वी हेरात शहराजवळील मशिदीतही स्फोट झाला होता.

# रिझर्व्ह बँक रेपो दरवाढ – कर्जे महागणार

## व्याजदर वाढीने महागाईवर नियंत्रण

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

अपेक्षेप्रमाणे रिझर्व्ह बँकेने महागाईला काबूत आणण्याचे पाऊल म्हणून मागील सहा महिन्यांतील चौथी व्याजदर वाढ शुक्रवारी केली. आधीच्या खेपांतील १४० आणि आजची ५० आधारबिंदू (बेसिस पॉइंट्स) अशी एकूण १९० आधारबिंदूंनी 'रेपो दर' वाढून तो आता ५.९० टक्के अशा तीन वर्षांच्या उच्चांकी पातळीवर गेला आहे. जगभरातील मध्यवर्ती बँकांकडून जे धोरण स्वीकारले जात आहे तेच अनुसरण्याशिवाय रिझर्व्ह बँकेला गत्यंतर नव्हते. त्यामुळे भारतात ताबडतोबीने घर, वाहन तसेच व्यक्तिगत कर्जांचे व्याजदर बँकांकडून वाढविले जाणे क्रमप्राप्त आहे. तरी कळीचा प्रश्न हाच की, या दरवाढीमागे सांगितली गेलेली



– महागाईवर नियंत्रण, रुपयाच्या अवमूल्यनाला बांध आणि परकीय चलनाचा देशाबाहेर सुरू असलेला ओघ थांबविण्याच्या दिशेने परिणाम ही उद्दिष्टे साधली जाणार काय आणि नेमकी केव्हा? रिझर्व्ह बँकेने व्याजाचे दर वाढविणे अपरिहार्यच होते काय?

मागील आठवडा-दोन आठवड्याच्या कालावधीत अमेरिका, इंग्लंड, स्वित्झर्लंड तसेच फिलिपिन्स, थायलंड, मलेशिया आदी आशियाई देशांच्या मध्यवर्ती बँकांनी व्याजदरात एकदम मोठी वाढ करण्याचे पाऊल टाकले. तसे करण्याचे कारण एकच – बेलगाम बनलेल्या चलनवाढीला अर्थात महागाईला काबूत आणणे. अर्थव्यवस्था विकसित राष्ट्रांची असो अथवा उद्योन्मुख राष्ट्रांची सर्वांना काही केल्या पाठ सोडत नसलेल्या चिवट महागाईने हैराण केले आहे. काल-परवा ऑस्ट्रेलिया आणि जर्मनीतही महागाईने कैक दशकांच्या उच्चांकाचा विक्रम मोडल्याचे वृत्त आले आहे. अमेरिकेतील मध्यवर्ती बँक – फेडरल रिझर्व्हने वर्षातील पाचवी, तर सलग तिसरी दरवाढ नुकतीच केली आहे आणि तिचेच अनुकरण जगभरातील अन्य मध्यवर्ती बँकांकडून त्याच तडफेने केले जात आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने वेगळे काही करणे अपेक्षित नव्हते आणि शुक्रवारी केली गेलेली अर्धा टक्क्याची दरवाढ होईल हे जवळपास गृहितच धरले गेले होते. पण केंद्रीय अर्थमंत्र्यांनी तर व्याजदर वाढीसारखे उपाय निष्फळ ठरत असल्याचे म्हटले होते?

# "काँग्रेसमधील हायकमांड संस्कृती..."

## अर्ज दाखल करताच शशी थरूर यांचं मोठं विधान

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी पक्षाचे खासदार शशी थरूर यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. शशी थरूर यांच्यासमोर पक्षाचे अनुभवी नेते मल्लिकार्जून खर्गे यांचं आव्हान असणार आहे. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर शशी थरूर यांनी पक्षासाठी आपली काय धोरणं असतील हे स्पष्ट केलं. यावेळी त्यांनी आपण पक्षातील हायकमांड संस्कृतीमध्ये बदल करु असं स्पष्ट सांगितलं. ते दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



शशी थरूर यांनी यावेळी प्रत्येक गोष्ट दिल्लीतील नेतृत्वाकडे ढकलण्याची पद्धत योग्य नसल्याचं सांगितलं. ते म्हणाले की, काँग्रेस अध्यक्ष ठरवतील हे एकच वाक्य सांगणारी व्यक्ती पक्षात नको. पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याकडे पक्षांतर्गत निवडणूक आणि स्थिर नेतृत्वाची मागणी करणाऱ्या जी-२३ नेत्यांमध्ये शशी थरूर यांचाही समावेश होता. काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक जाहीर झाली तेव्हा सर्वात प्रथम शशी थरूर यांनी उमेदवारीसाठी इच्छा व्यक्त केली होती.

मल्लिकार्जून खर्गे यांच्या उमेदवारीला गांधी कुटुंबाचा पाठिंबा असल्याची चर्चा आहे. यावर बोलताना शशी थरूर यांनी आपण नवा दृष्टीकोन देऊ असं सांगितलं. मल्लिकार्जून खर्गे यांनी जी-२३ मधील नेत्यांनीही पाठिंबा दिला आहे. दरम्यान, शशी थरूर यांनी आपल्या मनात खर्गेंच्या विरोधात कोणतीही भावना नसल्याचं स्पष्ट केलं.

# हरवत चाललेल्या मैत्रीला नवी पालवी देणारा 'सहेला रे'

मुंबई : अक्षय बर्दापूरकर प्रस्तुत मृणाल कुलकर्णी दिग्दर्शित 'सहेला रे' वेबचित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून काळाच्या विळख्याआड हरवून गेलेल्या 'ती' च्या अस्तित्वाला मैत्रीच्या हळुवार झुळकीने पुन्हा जिवंत करून, एक नवीन संजीवनी देणाऱ्या 'ती' च्या आयुष्याची कथा सांगणारा चित्रपट म्हणजे 'सहेला रे'. मृणाल कुलकर्णी, सुबोध भावे आणि सुमित राघवन यांच्या परिपक्व नात्यातील विविध छटा यात पाहायला मिळणार आहेत. दरम्यान या वेबचित्रपटातील 'रे मनाला' हे मनाला भिडणारे गाणेदेखील नुकतेच प्रेक्षकांच्या भेटीला आले असून या गाण्याला आदर्श शिंदे यांचा बहारदार आवाज लाभला आहे. मनातील चलबिचल व्यक्त करणाऱ्या या गाण्याचे बोल वैभव जोशी यांचे आहेत. तर सलील कुलकर्णी यांनी या गाण्याला संगीतबद्ध केले आहे.
आयुष्यात कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना एकमेकांना गृहीत धरता धरता नात्यातील हरवून गेलेला गोडवा पुन्हा मिळवण्यासाठीची 'ती'ची धडपड ट्रेलरमधून दिसत आहे. या धडपडीत तिला




तिचे अस्तित्व गवसेल का, याचे उत्तर 'सहेला रे' पाहिल्यावरच मिळेल.
चित्रपटाबद्दल मृणाल कुलकर्णी म्हणतात, " काही अनुकूल परिस्थिमुळे आयुष्याच्या परिघापलीकडे लोटली गेलेली माणसे जेव्हा पुन्हा आयुष्यात परतात, तेव्हा होणारी मनाची चलबिचल एका क्षणात भूतकाळात नेऊन उभी करते आणि त्यातूनच मग तिला तिचा स्वतःचा शोध लागतो. नात्यातील परिपक्वता यात अधोरेखित करण्यात आली आहे. हा एक कौटुंबिक चित्रपट आहे, जो वास्तववादी आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात अगदी अशाच पद्धतीने नाही परंतु थोड्याफार प्रमाणात असे क्षण येतात. 'प्लॅनेट मराठी'च्या सोबतीने हा चित्रपट आता प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. मला आशा आहे, 'सहेला रे' नक्कीच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल."
'प्लॅनेट मराठी'चे प्रमुख, संस्थापक अक्षय बर्दापूरकर म्हणतात, " वैविध्यपूर्ण कथा प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा आमचा प्रयत्न असतो. अशीच एक संवेदनशील, परिपक्व नात्याची कथा असलेला 'सहेला रे' आम्ही प्रेक्षकांसाठी घेऊन आलो आहोत. उत्तम कलाकार, गायक, संगीतकार यांची संपूर्ण टीम एकत्र आल्यावर नक्कीच काहीतरी उत्कृष्ट घडणार. 'सहेला रे' सर्वांना निश्चितच आवडेल."
अक्षय बर्दापूरकर, प्लॅनेट मराठी प्रस्तुत, मृणाल कुलकर्णी दिग्दर्शित 'सहेला रे' हा चित्रपट येत्या १ ऑक्टोबर रोजी प्लॅनेट मराठी ओटीटीवर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या वेबचित्रपटात मृणाल कुलकर्णी, सुबोध भावे आणि सुमित राघवन यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

## दीपिका- रणवीरच्या वैवाहिक आयुष्यात वादळ?



मागच्या काही काळापासून दीपिका आणि रणवीर यांच्या वैवाहिक आयुष्यात वादळ आल्याच्या चर्चा होताना दिसत आहेत.
बॉलिवूडमधील काही लोकप्रिय जोड्याबद्दल बोलायचं झाल्यास रणवीर सिंग आणि दीपिका पदुकोण यांचं नाव नेहमीच आघाडीवर असतं. दोघांनीही काही चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे. लग्नानंतरही ही जोडी कायम चर्चेत राहिली आहे. पण मागच्या काही काळापासून दीपिका आणि रणवीर यांच्या वैवाहिक आयुष्यात वादळ आल्याच्या चर्चा होताना दिसत आहेत. अशातच एका मुलाखतीत रणवीरने या सर्व चर्चांवर मौन सोडत पती- पत्नीतील संबंध कसे आहेत यावर मनमोकळेपणे भाष्य केलं.
काही दिवसांपासून सोशल मीडियावर रणवीर आणि दीपिका यांच्या वैवाहिक आयुष्याबद्दल उटल- सुलट चर्चा सुरू आहेत. या दोघांच्या नात्यात दुरावा आला असून दोघंही वेगळे होण्याच्या विचारात असल्याचं बोललं गेलं आहे. पण आता रणवीरचा असा एक व्हिडीओ समोर आला आहे. ज्यामुळे या दोघांच्या वैवाहिक आयुष्यात वादळ आल्याच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. या व्हिडीओमध्ये रणवीर म्हणाला, "देवाची कृपा आहे... आम्ही दोघं एकमेकांना भेटलो आणि २०१२ मध्ये डेट करायला सुरुवात केली आज दहा वर्षांनंतर २०२२ पर्यंत आम्ही एकमेकांना डेट करत आहोत." रणवीरचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर या चर्चा केवळ अफवा असल्याचं समोर आलं आहे. याशिवाय अलिकडेच एका अवॉर्ड शोमध्ये रणवीर आणि दीपिकाचा वेगळाच अंदाज पाहायला मिळाला होता.

## 'वाजले की बारा' गाण्यावर अमृता खानविलकरसह नोरा फतेहीने धरला ठेका

मराठमोळी अभिनेत्री अमृता खानविलकर 'कलर्स' वाहिनीवरील 'झलक दिखला जा' शोच्या दहाव्या सीझनमध्ये सहभागी झाली आहे. सौंदर्याने प्रेक्षकांना घायाळ करणाऱ्या अमृताच्या डान्सची परीक्षकांनाही भुरळ पडली आहे. बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित, नोरा फतेही आणि दिग्दर्शक करण जोहर या शोमध्ये परिक्षक आहेत. 'झलक दिखला जा'च्या एका भागात अमृताने लावणी सादर केली. अमृताचा डान्स पाहून नोरालाही लावणीचा मोह



आवरता आला नाही. नोराने अमृतासह लावणीच्या तालावर ठेका धरला. 'वाजले की बारा' गाण्यावर अमृता-नोराने ठसकेबाज लावणी सादर केली. नोराने हिरव्या रंगाची नऊवारी साडी नेसून मराठमोळा लूक केलेला पाहायला मिळला. अमृता-नोराच्या लावणी डान्सचा व्हिडीओ 'कलर्स'ने सोशल मीडिया अकाऊंटवरून शेअर केला आहे. अमृतानेही तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून नोरासह केलेल्या लावणी डान्सचा व्हिडीओ हटके कॅप्शनसह शेअर केला आहे. या पोस्टला तिने "लावणी करायलाच लावली पोरीला", असं कॅप्शन दिलं आहे. अमृताच्या या व्हिडीओवर चाहत्यांनी कमेंटही केल्या आहेत. एका नेटकऱ्याने कमेंट करत "चांगलच जोरात जमतंय की", असं म्हटलं आहे.


## 'अक्षय कुमार झाला हृतिक रोशनच्या आलिशान घराचा मालक?



बॉलिवूड इंडस्ट्रीतील स्टार्स अनेकदा त्यांच्या प्रॉपर्टीच्या खरेदी – विक्रीमुळे चर्चेत असतात. मध्यंतरीच शाहिद कपूर, मिलिंद सोमण, अमिताभ बच्चन यांनी नवीन घरे विकत घेतली. आता त्या यादीत अक्षय कुमारचेही नाव सामील झाले आहे. अक्षय कुमारने हृतिक रोशनचे घर खरेदी केल्याची बातमी आहे. विभक्त होण्यापूर्वी हृतिक रोशन आणि सुझान खान त्यांच्या कुटुंबासह जुहूमध्ये त्यांच्या वडिलोपार्जित बंगल्यात राहत होते. पण सुझानपासून विभक्त झाल्यानंतर हृतिक रोशन त्याच भागातल्या पलाझो अपार्टमेंटमध्ये शिफ्ट झाला. तिथे तो आपल्या आई-वडिलांसोबत राहत होता. बरेच महिने हृतिक त्याच्या आई-वडिलांबरोबर त्या घरी राहिला आणि अलीकडेच तो जुहू वर्सोवा येथील 'वर्तमान' अपार्टमेंटमध्ये शिफ्ट झाला आहे.
आता असे म्हटले जात आहे की हृतिक रोशन सुझानबरोबर ज्या बांगल्यात राहत होता ते घर अक्षय कुमारने खरेदी केले आहे. हृतिक रोशनने हे जुहूचे घर सोडण्यापूर्वीच अक्षय कुमारने ते खरेदी करण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र, अक्षय कुमारने हा करार केला आहे की नाही, याबाबत आतापर्यंत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पण त्यांनी या घराचा करार पक्का केल्याचे बोलले जात आहे. हृतिक रोशनचे हे जुहूचे घर त्याचे आजोबा जे. ओमप्रकाश यांचे होते. जे. ओमप्रकाश हेही चित्रपट निर्माते होते.

## शॉर्ट न्यूज »

### मेसीमुळे अर्जेंटिनाची जमैकावर मात



।हॅरिसन। महाईन्यूज

कर्णधार लिओनेल मेसीने केलेल्या दोन गोलच्या बळावर अर्जेंटिनाने मैत्रीपूर्ण फुटबॉल सामन्यात जमैकावर ३-० अशी मात केली. अर्जेंटिनाचा संघ आता सलग ३५ सामने अपराजित आहे. या सामन्यात अर्जेंटिनाने सुरुवातीपासून तुलनेने दुबळ्या जमैकावर वर्चस्व गाजवले. १३व्या मिनिटाला ज्युलियन अल्वारेझने अर्जेंटिनाचे गोलचे खाते उघडले. अर्जेंटिनाने एका गोलची आघाडी मध्यंतराला कायम राखली. त्यानंतर ५६व्या मिनिटाला मेसीचे बदली खेळाडू म्हणून मैदानात प्रवेश केला. त्याने ८६ आणि ८९व्या मिनिटाला गोल करत अर्जेंटिनाला हा सामना ३-० अशा फरकाने जिंकवून दिली.राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा अधिकृत उद्घाटन सोहळा गुरुवारी पार पडला असला, तरी काही क्रीडाप्रकारांना यापूर्वीच सुरुवात झाली आहे. तिलक ६२ चेंडूंत १ चौकार व ३ षटकारांसह ५० धावांवर बाद झाला. श्रीकर भरत

# रोहित सेनेला मोठा धक्का

।अहमदाबाद । महाईन्यूज ।

भारतीय क्रिकेट संघाला टी२० विश्वचषका आधी खूप मोठा झटका बसला आहे. संघातील प्रमुख जलद गोलंदाज जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे संघातून बाहेर झाला आहे. आगामी टी२० विश्वचषकाच्या दृष्टीने भारतीय संघ तयारी करत आहे. सध्या भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरोधात टी२० मालिका खेळत आहे. मात्र, त्याआधीच भारतीय संघाला हादरा देणारी एक माहिती समोर येत आहे. बीसीसीआयच्या खात्रीशीर सुत्रांनुसार भारतीय संघाचा हुकमी गोलंदाज जसप्रीत बुमराह हा पाठीच्या दुखण्यामुळे विश्वचषकच काय तर पुढचे पाच ते सहा आठवडे खेळू शकणार नाही. अगोदर रविंद्र जडेजा आणि आता जसप्रित बुमराह या दोन्ही महत्वाच्या खेळाडूंच्या अनुपस्थितीत भारतीय संघासाठी विश्वचषक जिंकणे आता निश्चितच सोपे नसणार आहे.



पुढील महिन्यात १६ तारखेपासून ऑस्ट्रेलियात टी२० विश्वचषक सुरू होत आहे. ही स्पर्धा तोंडावर आली असताना भारतीय संघासाठी वाईट बातमी समोर आली आहे. दुखापतीमुळे आशिया चषकमध्ये बुमराह खेळला नव्हता. तर त्यानंतर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत त्याने कमबॅक केले होते.बुमराहने २५ सप्टेंबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध अखेरची टी२० सामना खेळला होता. त्या सामन्यात बुमराहने ४ षटकात ५० धावा दिल्या होत्या. टी२० मधील ही त्याची सर्वात वाईट कामगिरी होती.

दरम्यान, कर्णधार रोहित शर्माच्या कर्णधारपदाच्या कालावधीतच खेळाडूंना दुखापत कशी होते असा मिश्किल प्रश्न चाहते विचारत आहेत. आगामी महिन्यात ऑस्ट्रेलियाच्या धरतीवर टी२० विश्वचषकाचा थरार रंगणार आहे. तर सततच्या विश्रांतीमुळेच खेळाडूंचा फॉर्म जात असल्याचे अनेक दिग्गज म्हणत आहेत. अशा परिस्थितीत बुमराहची दुखापत भारतीय संघाची डोकेदुखी वाढवणारी आहे. यावरूनच चाहत्यांनी बीसीसीआय आणि कर्णधार रोहित शर्माबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. बीसीसीआयचे वैद्यकीय पथक त्याच्या सोबत आहे. निवड समिती त्याच्या जागी अन्य खेळाडूची टी२० विश्वचषक संघात निवड करण्याची शक्यता आहे. टी२० विश्वचषकाच्या आधी भारतीय संघाला बसलेला हा दुसरा मोठा धक्का आहे. याआधी अष्टपैलू रविंद्र जडेजा देखील दुखापतीमुळे संघाबाहेर झाला होता.

# विहारीकडे शेष भारत संघाचे नेतृत्व

## इराणी चषकासाठी जैस्वाल, सर्फराज, धूलला संधी

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।



आगामी इराणी चषक क्रिकेट सामन्यासाठी अनुभवी फलंदाज हनुमा विहारीकडे शेष भारत संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली आहे. तीन वर्षांनंतर होणाऱ्या या सामन्यात शेष भारतापुढे २०१९-२०च्या हंगामातील रणजी करंडक विजेत्या सौराष्ट्रचे आव्हान असेल.

राजकोट येथे १ ते ५ ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या इराणी चषकाच्या सामन्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) बुधवारी १५ सदस्यीय शेष भारत संघाची घोषणा केली. या संघात मुंबईचा युवा सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि सर्फराज खान यांना स्थान मिळाले आहे. तसेच युवा (१९ वर्षांखालील) विश्वचषकात विजेत्या भारतीय संघाचे नेतृत्व करणाऱ्या यश धूलचाही शेष भारताच्या संघात समावेश करण्यात आला आहे. जैस्वाल, सर्फराज आणि धूल यांनी अलीकडच्या काळात प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. नुकत्याच झालेल्या दुलीप करंडकाच्या अंतिम सामन्यात जैस्वालने द्विशतक, तर सर्फराजने शतक साकारले. उदयोन्मुख वेगवान गोलंदाज उमरान मलिकचाही शेष भारताच्या संघात समावेश करण्यात आला आहे. फिरकीची धुरा जयंत यादव, सौरभ कुमार आणि साई किशोर सांभाळतील. संघ : हनुमा विहारी (कर्णधार), मयांक अगरवाल, प्रियांक पांचाळ, अभिमन्यू ईश्वरन, यशस्वी जैस्वाल, यश धूल, सर्फराज खान, के.एस. भरत (यष्टिरक्षक), उपेंद्र यादव (यष्टिरक्षक), जयंत यादव, सौरभ कुमार, साई किशोर, मुकेश कुमार, उमरान मलिक, कुलदीप सेन, अरझान नागवासवाला.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही